


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १६३ वा सोमवार दि. ११ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# उच्च न्यायालय सुट्टीवर आहे का? सुप्रीम कोर्टाने फटकारलं, राज ठाकरेंविरुद्धच्या याचिकेवर सुनावणीस SC चा नकार

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

मुंबईत गेल्या काही दिवसांपासून मराठी आणि अमराठी भाषेवरुन वाद सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. मनेसेचे पदाधिकारी काही हिंदी भाषिक किंवा अमराठी व्यापाऱ्यांना किंवा मराठी न बोलणाऱ्यांना मारहाण करत असल्याचं सोशल मीडियातून समोर आलं आहे. तर, ठाकरे बंधुंनी मराठीच्या मुद्द्यावरुन मेळावा घेतल्यानंतर केलेल्या भाषणावर आक्षेप घेत राज ठाकरे ंविरुद्ध न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. राज ठाकरेंविरुद्धच्या याचिकेवर सुनावणीस सुप्रीम कोर्टाने नकार दिला आहे. राज ठाकरे अमराठी लोकांविरुद्ध द्वेष पसरवत असल्याचा या याचिकेत आरोप करण्यात आला होता. राज ठाकरेंविरुद्धच्या याचिकेवर सुनावणीस सुप्रीम कोर्टाने साफ नकार दिला आहे. राज ठाकरेंविरोधात दाखल केलेली याचिका केवळ प्रचार आणि प्रसिद्धीसाठी असल्याचा ठपका सुप्रीम कोर्टाने ठेवला आहे. ज्यांनी याचिका दाखल केली ते याचिकाकर्ते हायकोर्टात का गेले नाहीत? उच्च न्यायालय सुट्टीवर आहे का?, असा सवाल कोर्टाने केला आहे. दरम्यान, राज ठाकरे अमराठी लोकांविरुद्ध द्वेष पसरवत असल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला होता. राज ठाकरेंविरोधातील याचिकेवर उच्च न्यायालयात जाण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. तसेच याचिकाकर्त्यास उच्च न्यायालयात



जाण्याचे स्वातंत्र्य देत सर्वोच्च न्यायालयाने याचिका मागे घेण्याचं सूचवलं आहे. त्यानंतर, याचिकाकर्त्यांनी याचिका सर्वोच्च न्यायालयातून काढून घेतल्याची माहिती समोर आली आहे.

# डिजिटल मिडिया परिषदेंचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन 14 सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे होणार-एस.एम.देशमुख

**जनसंचलन/ बुलढाणा**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा उपक्रम असलेल्या डिजिटल मिडिया परिषदचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणार असल्याची माहिती एस.एम.देशमुख यांनी दिली आहे.. डिजिटल मिडियात काम करणारया पत्रकारांसाठी अ. भा. मराठी पत्रकार परिषदेने डिजिटल मिडिया परिषद या नावाचा स्वतंत्र विभाग सुरू केला आहे.. राज्यातील ३० जिल्ह्यात आता डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या असून या माध्यमातील २००० पत्रकार परिषदेशी जोडले गेलेले आहेत.. उर्वरित जिल्ह्यात शाखा स्थापन करण्याची प्रकिया सुरू आहे.. परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणारया अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश आहे.. १४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता एकनाथ रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होईल.. डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं होतील.. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार आहे.. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणारया संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल.. डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही.. अधिवेशनात राज्य कार्यकारिणी निवडली जाणार आहे.. डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चँनल्स तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख नाही... ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत.. प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत.. त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे अधिवेशनात त्यासंबंधी देखील चर्चा आणि विचारविनिमय होणार आहे.. डिजिटल मिडियाच्या या पहिल्या अधिवेशनास




डिजिटल माध्यमातील पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहावं असं आवाहन परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, विभागीय सचिव रवी उबाळे, कार्यक्रमाचे निमंत्रक आणि संभाजीनगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी यांनी केले आहे

# समाज आरोग्याची मुहूर्तमेढ...

## संपादकीय लेख

नवनिर्मितीच्या क्षमतेसाठी जबाबदार असणाऱ्या स्रावांविषयी, स्वत:तल्या ङ्गस्त्रीफत्वाच्या ताकदीविषयी महिलांमध्ये आजही समजांपेक्षा गैरसमजच जास्त आहेत. त्यासाठी घरातल्या स्त्रीनेच आरोग्याची गुढी उभारली पाहिजे. मुलगी शिकली, प्रगती झाली हे घोषवाक्य नेहमी कानावर पडते. शालेय/महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर ती आरोग्याविषयी साक्षर झाली तर स्वत:बरोबरच ती ङ्गसमाजफआरोग्याची दिशाही बदलू शकते, एवढं सामर्थ्य तिच्यात नक्कीच आहे. स्त्री उद्योजिकांसाठी भरवण्यात आलेल्या एका शिबिरात मी त्यांना प्रश्न विचारला, ङ्गहार्मोन्स म्हटल्यावर तुमच्या मनात कोणते विचार येतात?फत्यावर आलेली उत्तरं होती, ङ्गपाळीच्या तक्रारी, चिडचिड, वजनवाढ, चेहऱ्यावरची नकोशी लव, अस्वस्थताफआणि बरंच काही. नवनिर्मितीच्या क्षमतेसाठी जबाबदार असणाऱ्या स्रावांविषयी, स्वत:तल्या ङ्गस्त्रीफत्वाच्या ताकदीविषयी महिलांमध्ये आजही समजांपेक्षा गैरसमजच जास्त आहेत. हार्मोन्सच्या सकारात्मक प्रभावाविषयी खूप कमी जणांना माहिती आहे. स्त्री म्हणून जन्माला आल्याच्या क्षणापासूनच ङ्गस्त्रीफच्या अनेकविध वैशिष्ट्यांसह तिचं वेगळेपण तिच्या पेशीपेशींत झिरपत असतं. शासकीय रुग्णालयात स्त्रीरोग-प्रसूतीशास्त्राचा अभ्यास करताना असं लक्षात आलं गर्भारपणातल्या बिकट प्रसंगी मुलाच्या गर्भापेक्षा मुलीचा गर्भ तुलनेने सातत्य, चिवटपणा, शक्ती या गुणांमध्ये अधिक उत्तम ठरतो आणि टिकूनही राहतो. वाढीच्या टप्प्यातही या ऊर्जेचं वैशिष्ट्य चिकित्सा अनुभवात आढळून येतं. काही विशिष्ट स्रावांमुळे स्त्रीचं हृदयविकारांपासूनही निसर्गत:च रक्षण होतं.याबरोबर एका वैद्यकीय सर्वेक्षणात एक महत्त्वाची बाब आढळून आली आहे. युवावस्थेतल्या मुलींच्या मासिक चक्राची नियमितता आणि सर्वांगिण आरोग्यावर बीजनिर्मिती, भावी मुलाच्या आरोग्यपूर्ण आयुष्याचं भविष्यही अवलंबून असतं. यासाठी काय तपासलं पाहिजे? या लक्षणांपैकी दोन किंवा अधिक लक्षणं मुलींमध्ये असतील तर वेळीच तिला तज्ज्ञांकडून वैद्यकीय मार्गदर्शन, आहार-विहाराबाबत समुपदेशन मिळणं आवश्यक आहे. नवनिर्मितीच्या हार्मोन्समुळे मुलगी तेजस्वी, ऊर्जावान आणि कल्पक होणं स्वाभाविक आहे. याविरोधी लक्षणं ही बीजकोष विकृतीसंबंधी (पीसीओएस) असू शकतात. या लक्षण समूहाकडे वेळीच लक्ष दिलं नाही तर भविष्यात गर्भारपणाच्या अवस्थेत मुलींना मधुमेह होण्याची शक्यता वाढते. सध्या भारतातल्या २७ टक्के गर्भवती महिलांना गर्भावस्थेतल्या मधुमेहाचा त्रास आहे, असं संशोधनातून कळलं आहे. या महिलांच्या बाळांनाही भविष्यात मधुमेह होऊ शकतो. त्याचबरोबर बाळंतपणानंतर त्यांना स्वत:लाही मधुमेह होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे १२ ते ३५ वर्षांपर्यंतचा काळ स्त्रियांच्या आयुष्यातल्या प्रत्येक क्षणाला महत्त्व देण्याचा काळ आहे. या काळातल्या स्त्रियांच्या जेवणाच्या पद्धती, मानसिक जडणघडण याचा परिणाम समाजआरोग्यावरही होतो. या गोष्टी अधिक सोप्या करून समजावून घेऊ जेणेकरून नेमकं काय केलं पाहिजे, हे लक्षात येईल.
१. पाळी सुरू होण्याच्या कालावधीत आणि पुढे काही वर्षं ब्रेड, बिस्किटं, नूडल्स, कृत्रिम रंगद्रव्यं असणारे पदार्थ, जॅम, जेली आणि बैठी जीवनशैली या गोष्टी टाळल्या पाहिजेत.
२. आत्यंतिक ताणतणावामुळे मानसिक थकवा आणि पर्यायाने पाळीच्या तक्रारी उद्भवतात. त्यासाठी नियमित योगसाधना आणि व्यायामाला पर्याय नाही.
३. कंबर आणि नितंब यांच्या घेराचं प्रमाण (०.७) असावं लागतं. त्यात अनियमितता असल्यास वेळीच सावध व्हावं.
४. पाळीच्या दिवसांत अतिरेकी श्रम टाळावेत.
५. पाळीच्या आठवडाभर आधी जास्तीचं मीठ खाणं टाळावं. काळ्या मनुका, अंजीर, दूध+तूप, फळं, भाज्या यांचं सेवन करून पोट साफ
०६. कोहळा, आवळा, सातू, लाल भोपळा, त्याच्या बिया, उडीद डाळ,ताक, ऋतुनुसार फळं, हातसडीचा तांदूळ, ज्वारी, बाजरी, बडीशेप, नाचणी, राजगिरा, तीळ, खोबरं, जर्दाळू, चारोळ्या आदी गोष्टींचा आहारात आवर्जून समावेश करावा. भूक लागल्यानंतर खाणं आणि भूक नसताना न खाणं हा साधा नियमतही खूप उपयोगी पडतो. उत्तम आहाराबरोबर उत्तम पचनशक्ती असणं तितकंच महत्त्वाचं आहे.
७. चैत्र महिन्याच्या हळदी-कुंकू समारंभात स्त्रिची ओल्या हरभऱ्यांनी ओटी भरतात. ओले हरभरे हे कॅन्सर प्रतिबंधक नैसर्गिक तत्वांनी युक्त असतात. भारतीय सण-संस्कृती शास्त्रीयदृष्ट्या समजून घेऊन आरोग्यसंस्कृती म्हणून अंगीकारली पाहिजे.
८. गर्भारपणात गर्भाशय आणि आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम गर्भाच्या शरीर आणि मनाच्या जडणघडणीवर होतो, याचा कुटुंबियांनीही विचार केला पाहिजे. आयुष्याच्या प्रत्येक वळणवाटेवर आपल्या ङ्गहार्मोन्सफला



आनंदलहरी मानलं पाहिजे. अडचणींना आव्हानांचं स्वरूप देऊन आपल्याला ङ्गतीफला उभारी घेण्याची मोकळीक दिली पाहिजे. संकल्प केला तर सिद्धीचे क्षितीज नक्कीच दूर नाही. पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर स्त्रियांनी आपल्या आरोग्याचा ङ्गवसंतोत्सवफसाजरा करायला हवा.
१. एका वेळी एकच काम अर्थात अनेक कामं करण्याची क्षमता असली तरी ऊर्जा साठवणं खूप महत्त्वाचं आहे.
२. ङ्गमाझाफ वेळ ङ्गमाझ्याफसाठी चिंतन, आनंद, तणाव घालवण्यासाठी दिवसातला थोडा तरी वेळ स्त्रियांना स्वत:साठी मिळाला पाहिजे.
३. आपल्यातलं ङ्गस्त्रीफत्व आपणच फुलवलं पाहिजे. त्याला दैवी बनवण्यापेक्षा किंवा हीनभाव-दयेच्या चक्रात गुंतवण्यापेक्षा मानवतेच्या सामान्य हक्कांचा आनंद जपला पाहिजे.
४. स्त्रीमनातल्या भावभावनांचा तिच्या गर्भाशय आणि हार्मोन्सवर परिणाम होत असतो, हे नीट लक्षात ठेऊन शरीरासह मनाची निगा राखणं गरजेचं आणि अपरिहार्य आहे. थोडक्यात स्त्रीने प्रत्येक क्षण साजरा करायला शिकलं पाहिजे. आनंदी वृत्ती, संकल्प शक्ती, अडचणींचं आव्हानांमध्ये रूपांतर, सजगता, आत्मविश्वास या पंचसूत्रीला स्त्रीआरोग्याची गुरूकिल्लीच मानता येईल. स्त्रियांकडे ऊर्जेचा प्रचंड साठा असतो. त्या बळावर भारतातल्या घरोघरी आरोग्यगुढी उभारली गेली पाहिजे.




## पूरात दुचाकीसह वाहून जाणाऱ्या युवकाचे वाचविले प्राण

**जनसंचलन/बुलढाणा**

जांभोरा सोनोशी येथील नदीला आलेल्या पूरामुळे शनिवारी मोठा धोका निर्माण झाला. परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे पाणी पुलावरून वाहत होते. पुलाची उंची कमी असल्याने दरवर्षी येथे अशी पूरस्थिती निर्माण होते. परिणामी वाहतूक ठप्प होत असून, ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. अशा धोकादायक परिस्थितीत एका तरुणाने दुचाकीसह पुरातून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, मध्यभागी पोहोचल्यावर दुचाकीचे संतुलन बिघडले आणि तो पाण्याच्या प्रवाहात वाहू लागला. याचवेळी सोनोशी येथील शेख जावेद आणि शेख आसिफ यांनी क्षणाचाही विलंब न करता, तसेच जीवाची पर्वा न करता पुरात उडी घेतली. त्यांनी त्या तरुणासह दुचाकी पाण्याबाहेर काढून सुरक्षित स्थळी पोहोचवली. पूरात दुचाकी वाहून जात असल्याचे दृश्य. या धाडसी आणि निःस्वार्थी कृतीमुळे तरुणाचा जीव वाचला. घटनेच्या वेळी उपस्थित असलेले काहीजण केवळ आरडाओरडा करत राहिले, मात्र जावेद आणि आसिफ यांच्या प्रत्यक्ष मदतीमुळे युवकाचे प्राण वाचले. गावकऱ्यांकडून त्यांचे कौतुक होत आहे. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अजित पवारांकडून तीन महापालिकांची घोषणा, पण मुख्यमंत्र्यांनी दादांचा दावा खोडला, फडणवीस म्हणाले...

**पुणे :** पुणे आणि परिसराचा वाढता पसारा लक्षात घेता नव्याने महापालिका स्थापन करण्याची मागणी सातत्याने केली जात असताना, त्यावरून आता राज्य सरकारमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाल्याचे चित्र शुक्रवारी पाहायला मिळाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात तीन महापालिकांची गरज असल्याचे जाहीर केले असताना, मुख्यमंत्र्यांनी पवार यांचा दावा फेटाळून, नव्याने केवळ एका महापालिकेची गरज असल्याचे नमूद केले. त्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरासाठी नक्की एक महापालिका होणार की तीन महापालिका होणार, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.महापालिकेच्या हद्दीत



३२ गावांचा समावेश झाल्यानंतर बृहन्मुंबई महापालिकेपेक्षा पुणे महापालिकेची हद्द मोठी झाली. तेव्हापासून महापालिकेचे विभाजन करून नव्याने महापालिका निर्माण करण्याची मागणी होत आहे. पुण्याप्रमाणे पिंपरी-चिंचवड महापालिकेलगतच्या नागरीकरण वाढल्याने तेथेही नव्याने आणखी एक महापालिका स्थापन केली जावी, असा आग्रह धरला जात आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सकाळी चाकण परिसराची पाहणी केली, त्या वेळी पुण्यासाठी नव्याने तीन महापालिकांची गरज अधोरेखित केली. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी मात्र नव्या तीन महापालिकांचा पवार यांचा दावा खोडून काढला. सध्या पुणे जिल्ह्यात दोन महापालिका अस्तित्वात असून त्याशिवाय आणखी एक महापालिका गरजेची आहे, असेच पवार यांना म्हणायचे असावे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.मांजरी, फुरसुंगी, उरळी देवाची या भागात एक महापालिका, चाकण भागात एक आणि हिंजवडी भागात एक महापालिका करावी लागणार आहे. तुम्हाला आवडो किंवा न आवडो पण नजीकच्या काळात चाकण आणि या सर्व परिसरामध्ये महानगरपालिका करावी लागणार असल्याचं अजित पवार म्हणाले होते.स्वतंत्र महापालिका स्थापनेचा निर्णय स्वागतार्ह आहे. त्यामुळे वाढत्या नागरीकरणाच्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी एकच केंद्र निर्माण होईल; परंतु यासंदर्भात नागरिकांना विश्वासात घ्यावे लागेल. साधकबाधक चर्चा करावी लागेल. अस्तित्वात असलेल्या महापालिकांचे प्रश्न आणि हद्दवाढीतील गावांची परिस्थिती याबाबत अभ्यास करावा लागेल. स्वतंत्र पालिका स्थापनेचे महत्त्व लोकांना पटवून दिल्यास ते निश्चितपणे साथ देतील, असं खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे म्हणाले.

# अल्पवयीन मुलगी शिक्षणासाठी फलटणला गेली, तरुणाने गोड बोलत मैत्री केली, नंतर सलग ५ वर्षे...

**बारामती :** शिक्षणाच्या निमित्ताने मुलगी फलटण येथे असताना फलटणमधील गौरव आदेश निंबाळकर याने तिच्याशी ओळख काढून तिच्याशी बोलत मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर ओळखीच्या निमित्ताने २०२० मध्ये आणि त्यानंतर वेळोवेळी २०२५ पर्यंत आरोपीने पीडित मुलगी अल्पवयीन असतानाही जबरदस्तीने बलात्कार केला, तसेच वारंवार वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन बलात्कार केला. या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलिसांनी पोक्सोसह बलात्कार आणि अपहरणाचा गुन्हा दाखल केला याप्रकरणी वडगाव निंबाळकर पोलिसांनी दिलेली माहिती अशी गौरव निंबाळकर हा फलटण येथील रहिवासी आहे. पीडित मुलगी ही २०१९ मध्ये त्या ठिकाणी शिक्षण घेत असताना त्याने तिच्याशी ओळख वाढवली. त्याने २०२० मध्ये पीडित मुलगी तिच्या घरात एकटी असताना तिच्याकडे शरीर सुखाची मागणी केली. त्यावरून तिने नकार दिला असता, गौरव निंबाळकर याने पीडित मुलीस शिवीगाळ करत मी तुझ्या घरच्यांना काहीही सांगून



बदनामी करीन अशी धमकी दिली. त्यानंतर मुलीने त्याच्याशी बोलणे बंद केले. मग फिर्यादीने फोन बंद करून ठेवल्यानंतर आरोपी हा तिच्या राहत्या घरी आला आणि त्याने तू माझ्याशी फोनवरून बोलणे बंद केले, तर मी तुझ्या आई-वडिलांना तुझे आणि माझे लफडे आहे असे सांगेन असे म्हणत त्याने धमकी आणि शिवीगाळ केली.डिसेंबर २०२१ मध्ये मुलगी अल्पवयीन असतानाही त्याने तिला शेजारील एका पडक्या खोलीत नेऊन तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर चार ते पाच वेळा त्याने त्या ठिकाणी नेऊन तिच्यावर तिच्या इच्छेविरुद्ध बलात्कार केला. त्यानंतर एक दिवस मोटरसायकलवर बसून नेऊन फलटण येथील साईरत्न लॉजवर त्याने तिच्या इच्छेविरुद्ध शरीर संबंध केले. त्याचे फोटो आणि व्हिडिओ काढून तिला धमकावले आणि ब्लॅकमेलिंग केले. त्यानंतर फेब्रुवारी २०२४ पर्यंत वारंवार त्याच लॉजवर नेऊन त्याने तिच्याशी संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर ७ ऑगस्ट २०२५ मध्ये फिर्यादी राहत असलेल्या करंजेपूल नजीकच्या घरी येऊन माझ्याकडे तुझे फोटो व्हिडिओ आहेत, तू माझ्यासोबत लॉजवर चल, नाहीतर मी तुझे फोटो व्हिडिओ व्हायरल करेल, अशी धमकी दिली. हा प्रकार वारंवार होत असल्याने अखेर पीडित युतीने वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात गौरव आदेश निंबाळकर यांच्या विरोधात भा.द.वि. कलम ३५४,३५४अ ,३७६(२) (एन), ४५२, ५०४, ५०६, सह बा.लैं.अ.सं.अधि.२०१२ चे कलम ४,८,१२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मृत्यूनंतरही बायकोचे हट्ट संपेना, भूत होऊन देतेय त्रास!



**मुंबई:** रिंकू राजगुरू , सुबोध भावे , प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव या कलाकारांचा हॉरर कॉमेडी असणारा सिनेमा- बेटर-हाफची लव्ह स्टोरी लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. प्रेम, भूत आणि हास्याचा मेळ पाहायला मिळणार असून नुकताच या सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. ट्रेलरमध्ये या घोस्ट कॉमेडीची झलक पाहायला मिळाली. सुबोध भावे आणि रिंकू राजगुरू ही जोडी नवरा-बायकोच्या भूमिकेत पाहायला मिळणार असून, अनिकेतने सुबोधच्या बेस्ट फ्रेंडची भूमिका साकारली आहे. सुबोध आणि प्रार्थना या पात्रांमधील मैत्रीही लक्ष वेधून घेणारी ठरली.या आधी या सिनेमातील पालतू फालतू आणि ना कळले कधी तुला ही गाणी रीलिज झाली आहेत. आता ट्रेलरमधून गोंधळात टाकणाऱ्या प्रेमकथेची झलक पाहायला मिळाली. ज्यात रिंकू साकारत असलेले सोनियाचे पात्र भूताचे असल्याचे स्पष्ट होते आहे.सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत, रजत मीडिया एंटरटेनमेंट निर्मित या सिनेमाच्या ट्रेलरमध्ये असे दाखवण्यात आले आहे की, सुबोधच्या पात्राच्या पत्नीचे निधन झाल्यानंतर, तिचा आत्मा त्याच्याच शरीरात वास करतो आहे. त्यातून सुटका मिळवण्यासाठी त्याचा संघर्ष सुरू असतो. ज्यात प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांची त्याला साथ मिळते. आता हा आत्मा सुबोधच्या पात्राला काय काय करायला भाग पाडेल आणि त्याची यातून सुटला होईल का, हे सिनेमा रीलिज झाल्यानंतरच समजेल.या चित्रपटाविषयी दिग्दर्शक संजय अमर यांनी अशी प्रतिक्रिया दिली की, ही घोस्ट कॉमेडी असली तरी ती एका आगळ्यावेगळ्या प्रेमकथेची सांगड घालते. कलाकारांच्या ताकदीमुळे ही संकल्पना पडद्यावर प्रभावीपणे साकारता आली. सुबोध आणि रिंकूची फ्रेश जोडी, प्रार्थना आणि अनिकेतसारखे अनुभवी कलाकार यांचं योगदान अमूल्य आहे. तर निर्माते रजत अग्रवाल यांनी असे म्हटले की, आजच्या पिढीला नेहमी काहीतरी हटके आणि नाविन्यपूर्ण बघायचं असतं. बेटर-हाफची लव्हस्टोरी हे त्याचं उत्तम उदाहरण आहे. यामध्ये विनोद, सस्पेन्स, भावना आणि स्टारकास्ट यांचं परिपूर्ण मिश्रण आहे.

# पर्यटन विकासाचा नर्मदा पॅटर्न!



गुजरात राज्यातील नर्मदा नदी आणि या नर्मदा नदीच्या काठावर गरुडेश्वर हे धार्मिक, आध्यात्मिक मन:शांती देणारे माणगाव (सिंधुदुर्ग) येथील जन्मस्थान असलेले प.पू. टेंबेस्वामींचे समाधी स्थान. यामुळे गुजरात राज्यातील गरुडेश्वर व कोकणचं एक वेगळच नातं आहे. महाराष्ट्रातील, मध्य प्रदेश, गुजरात या राज्यातील प.पू. टेंबेस्वामींचे भक्तगण गरुडेश्वरला जातातच.
यामुळे गरुडेश्वरला जाऊन प.पू. टेंबेस्वामींच्या समाधीस्थळी नतमस्तक व्हावं हा विचार अनेक वेळा येऊन गेला; परंतु मागील महिन्यातच हा योग आला. गुजरात राज्यातलाही हा पहिलाच प्रवेश आणि प्रवास होता. महाराष्ट्रावर अन्याय करत गुजरात राज्यामध्ये उद्योग प्रकल्प नेले किंवा गेले म्हणून फारच कांगावा केला जातो; परंतु असं का घडत असावं, हा प्रश्नही मनात सतत टोचत होताच. दादर-एकतानगर रेल्वेने एकतानगर रेल्वे स्टेशनवर उतरल्यावर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्हीजनची सहज कल्पना येऊन जाते. बडोदा, सूरत रेल्वे स्टेशन पार करत सकाळी ७ वाजता ही रेल्वे एकतानगरला पोहोचते. रेल्वे प्रवासात आपण नेहमी ऐकलेली सूरत, बडोदा ही स्थानकं झोपेत असतानाच केव्हाच निघून जातात. सूरत शहराचे नाव तर गेल्या दोन महिन्यांपूर्वी फारच चर्चेत आले होते. कापड व्यावसायाचा किंवा कापड खरेदीचा विषय आला तरीही कापडातले फार काही कळलं नाही तरीही सूरतला कापड स्वस्तफ एवढं सहज कोणीही बोलून मोकळा होतो. तसंच बडोदा शहराबद्दल मराठी मनाचे राजे सयाजीराव गायकवाड या राजघराण्यामुळे आणि शास्त्रीय संगीतातील अनेक घराणी या बडोदा शहराशी जोडलेली आहेत. नर्मदा परिक्रमेमुळे नर्मदा नदी किती राज्यांना वळसा घालून जाते, याची चर्चाही आपण करत असतो; परंतु गुजरात राज्यामध्ये नर्मदा जिल्हा आहे, हे माहीत नव्हतं. त्याचा परिचय गुजरातला गेल्यावर समजला. नर्मदा जिल्हा हा आदिवासी भाग असलेला; परंतु एकतानगरमधील राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेले सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या परिसराने जगाचं जस लक्ष वेधून घेतलंय तसंच ते पर्यटकांचं एक आकर्षण असलेलं पर्यटनस्थळ झालं आहे. हजारो पर्यटक या पर्यटनस्थळाला भेट देत असल्याने नर्मदा जिल्ह्याला एक वेगळंच महत्त्व प्राप्त झालं आहे. या नर्मदा जिल्ह्यातील या भागात फिरताना स्वच्छ सुंदर आणि रुंद रस्ते यामुळे प्रवास करताना सुखकर व आनंददायी प्रवास होतो. दररोज हजारो पर्यटक या एकतानगरला येत असल्याने रोजगाराच्या वेगवेगळ्या संधी निर्माण झाल्या आहेत. एकीकडे उद्योग व्यवसायाला गुजरातमध्ये रेड कार्पेट घातलेलं असतानाच पर्यटन व्यवसायातून आर्थिक सुबत्ता आणण्याचा प्रयत्नही दिसून येतो. एकतानगरमधील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ८२ फूट उंचीच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या पायथ्याशी जेव्हा आपण पोहोचतो, तेव्हा त्यातली भव्यता, तो तयार करण्यासाठीचे परिश्रम आणि त्या नर्मदेच्या काठावर वसलेलं हे एक नवं श्रीमंत शहर सहज आकर्षित करतं.
कोणताही एखादा मोठा प्रकल्प उभा राहतो, तेव्हा दोन मतप्रवाह असतातच तसे ते या एकतानगरच्या भव्यतेतही जाणवले. भूमिपुत्रांचे म्हणून काही वेगळे प्रश्नही असतात. त्यांच्या म्हणून काही वेदनाही असतात; परंतु या प्रकल्पांनी रोजगार, स्वयंरोजगाराच्या एक वेगळ्या संधी निश्चितच निर्माण झालेल्या दिसल्या. गावातून एकतानगरला येणाऱ्या इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या रिक्षा दिसतात. या मार्गावर १०० रिक्षा धावतात. याच आदिवासी भागांतील १०० तरुणींना रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण दिले गेले. आज या १०० मुली पुरुषांनाही मागे टाकतील, अशा पद्धतीने रिक्षा व्यवसाय करतात. प्रवाशांशी अदबीने वागणं, बोलणं असतं. तसेच येणाऱ्या पर्यटक प्रवाशांना नर्मदा जिल्ह्यातील पर्यटनस्थळांविषयीची माहिती देतात. याच नर्मदा जिल्ह्यात निळकंठधाम परिसर आहे. पूर्णत: व्यावसायिकता इथे आहे. याच परिसरात स्वामीनारायण मंदिर आहे. या मंदिरातही सारा श्रीमंती थाट आहे. स्वामीनारायण ट्रस्टच्या शैक्षणिक संस्था असल्याचीही माहिती मिळते. मात्र या निळकंठधाममध्ये आपला वेळ कसा जातो कळतच नाही. इथे सार्वजनिक विश्रांती स्थळ आहेत. पोहीच्या गावात हे आहे. याच पोहीच्या मध्ये नदी पार केल्यावर कुबेरभांडारी आणि कालिका मंदिर आहे. आपल्या देशात कुबेराची दोनच मंदिरे आहेत. यातल एक मंदिर हे गुजरातमधील या नर्मदेच्या काठावर आहे. निळकंठधाम ते कुबेरभांडारी मंदिर हा प्रवासाचा जुनाट असलेल्या प्रवासाचा थरारक अनुभव शब्दांतून सांगणेही अवघडच आहे.
नदीतील दगडातून ज्या सुसाट वेगाने सुमोगाड्या आदिवासी मुलं ज्या लीलया चालवतात, नव्हे पळवतात तो थरार तेथे जाऊनच अनुभवावा लागेल.
नदीतील नावेचा प्रवास आणि अडीचशे पायऱ्या चढून साक्षात कुबेराचं दर्शन!
कुबेराचं दर्शन घेतल्यावर, कालिका, महालक्ष्मीचं दर्शन होतं. छोट्या मुलांसाठी त्यांचे पाच तास वेगवेगळ्या खेळांमध्ये निघून जातात. टॉयट्रेनमधला प्रवासही छोट्या-मोठ्यांना खूप आनंद देऊन जातो. जे चांगलं आहे, बदलत आहे, त्याचा स्वीकार महाराष्ट्रानेही करायला हवा. एकतानगरमध्ये फिरताना अनेक गोष्टी पाहिल्या, त्यात एक बाब सहज जाणवली महाराष्ट्रात असंख्य पर्यटनस्थळ आहेत; परंतु ती उपेक्षितच आहेत. राज्यात सरकार कोणाचंही असू देत; परंतु राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन कसा आहे, विकासातून जनतेला काय मिळणार आहे, जनतेचं आयुष्य बदलणार आहे का? याचा विचार खरं तर व्हायला हवा. महाराष्ट्राच्या दुर्दैवाने असा विचार फार कधी होताना दिसला नाही. कोकणाचाच विचार करताना कोकणातील पर्यटनातून महाराष्ट्राच्या तिजोरीला मोठा हातभार लागेल; परंतु कोकणातील पर्यटनस्थळांकडे ज्या मूलभूत सोयी-सुविधा पुरविणे आवश्यक आहेत. त्याकडे पाहिले जात नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले गडकिल्ले घटका मोजत आहेत. त्यावर लक्ष केंद्रित केलं तरीही बरंच काही होईल; परंतु तेवढी विधायक दृष्टीच नाही. महाराष्ट्रानेही आपल्या राज्यात असलेल्या पर्यटनस्थळांच्या विकासाचा नवा विचार केला पाहिजे.
गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील अनेक गावांचा मुखडा बदलला आहे. निवास न्याहारी योजना गुजरातमध्ये आहे. स्वत:च्याच घरात, शेतघरात येणाऱ्या पर्यटकांना चांगली सेवा देत आर्थिक सक्षमता आणण्याचा प्रयत्न झाला आहे. जगभरातील पर्यटक आपल्याकडे आले पाहिजेत. त्यांनी अखंड गुजरात फिरावे, पर्यटनस्थळं पाहावीत. हा व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून पर्यटन प्रकल्प राबविण्यात आले आहेत. महाराष्ट्रामध्ये सुदैवाने सर्व काही निसर्गाने ओंजळ भरून दिलंय. फक्त जपायचं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी गडकिल्ल्यांची एवढी मोठी अमानत दिलीय; परंतु त्याची जपणूक करण्याची मानसिकताही आपली नाही, हे खरंच दुर्दैव आहे. व्यावसायिकता आणि उद्योगीपणा गुजरातमध्ये आहेच. त्याच अनुकरण महाराष्ट्राने करायला हवे. केवळ मराठी अस्मितेफ्च्या गावगप्पांनी आर्थिक सक्षमता आणता येणारी नाही. महाराष्ट्रात राज्यकर्ते कोणीही असले तरीही त्यांनी हा सकारात्मक विचार या पुढच्या काळात करायला हवा, तरच महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय वाढू शकेल. गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील पर्यटन विकासातून पर्यटन विकासात नर्मदा पॅटर्न पुढे आला आहे. हा नर्मदा पॅटर्न समोर ठेवून महाराष्ट्रात काय करता येईल?, याचा विचार शासनकर्त्यांनी करावा.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# एमएमआरडीएच्या अंकुश, अनधिकृत बांधकामांवर बडगा; महामुंबईतील नऊ भाग प्राधिकरणाच्या अखत्यारित...



**मुंबई :** महामुंबई परिसरात अनधिकृत बांधकामांचा प्रश्न मोठा आहे. ही समस्या सोडवण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात येत आहेत. आता याबाबत एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून महामुंबई परिसरातील नऊ महत्त्वाच्या भागांतील अनधिकृत बांधकामांवर अंकुश ठेवण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (एमएमआरडीए) देण्यात आले आहेत. यामध्ये विशेष क्षेत्रांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या काही भागांचाही समावेश आहे.एमएमआरडीएवर महामुंबईतील एकूण ६ हजार चौरस किमीहून अधिक क्षेत्रफळावरील विकासाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामध्ये ११ महापालिका क्षेत्रे व चार जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागातील महत्त्वाच्या विकासकामांचे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून एमएमआरडीएची नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे या भागातील अनधिकृत बांधकामे खपवून घेतली जाणार नाहीत, असे एमएमआरडीएने स्पष्ट केले.एमएमआरडीएकडून या अधिसूचित परिसरातील नागरी विकासात शिस्तबद्धता आणि कायदेशीरतेला चालना देण्यासाठी अनधिकृत बांधकामांवर प्रभावी नियंत्रण ठेवले जाणार आहे. या भागांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत अनधिकृत विकासकामांविरुद्ध वेळीच आणि कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार एमएमआरडीएला असतील. त्याची अंमलबजावणी अधिक सक्षमपणे करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे प्राधिकरणाने म्हटले आहे.एमएमआरडीएकडून महामुंबई परिसरात १ लाख १८ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाची विकासकामे सुरू आहेत. त्यामध्ये मुंबई महापालिका क्षेत्राबाहेरील भागांना म्हणजेच महामुंबईला मुंबईशी जोडणाऱ्या मेट्रो, उन्नत मार्गिका, जोडरस्ते, उड्डाणपूल अशा विविध प्रकल्पांचा समावेश आहे. एकूण आठ मेट्रो मार्गिकांची उभारणी सुरू असून अन्य दोन मार्गिकांचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे.

अशा सर्व विकासकामांच्या पार्श्वभूमीवरच महामुंबई प्रदेशातील या काही भागांचे एमएमआरडीए विशेष नियोजन प्राधिकरण आहे. त्यात विशिष्ट भागांचा समावेश आहे. संपूर्ण क्षेत्र एमएमआरडीएकडे नाही.या परिसरातील कायदेशीर बांधकामे व विकासासाठी विशेष कार्यप्रणाली (एसओपी) एमएमआरडीएने तयार केली आहे. त्यामध्ये बेकायदा बांधकाम आढळून आल्यास योग्य व न्याय्य नोटीस बजावणे, नियमानुसार संपूर्ण प्रक्रिया राबविणे, योग्य दस्तावेजीकरणासह न्यायालयीन निर्देशांप्रमाणे कारवाई करणे यांचा समावेश असेल, असे एमएमआरडीएने स्पष्ट केले आहे.

## ज्या मृत चिमुकलीच्या हाताचं प्रत्यारोपण, तिच्याच दादाला मुंबईकर तरुणीने राखी बांधली, आई म्हणाली माझी लेक परतली

**मुंबई :** कृत्रिम किंवा नैसर्गिक आपत्तीमध्ये गंभीर शारीरिक दुखापत होऊन एखादा अवयव गमवावा लागला तर आयुष्यात त्या व्यक्तीला मोठी किंमत मोजावी लागते. मात्र हात प्रत्यारोपणासारख्या प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे नव्या आयुष्याची भेट मिळू शकते.

एका अत्यंत गंभीर अपघातामध्ये हात गमावलेल्या मुंबईतील १३ वर्षीय सोना (नाव बदलले आहे) हिने हात प्रत्यारोपण शस्त्रक्रियेनंतर या नव्या कृत्रिम हाताने राखी बांधली आहे. विशेष म्हणजे, ज्या मुलीचे हात सोनाला मिळाले, तिच्या भावासोबत सोनाने रक्षाबंधन साजरे केले. या क्षणी राखी बांधलेला भाऊरायाही गहिवरला अन् दोन्ही कुटुंबीयांचे डोळेही पाणावले. माझी मुलगीच परत आल्यासारखं वाटलं, अशा भावना दात्रीच्या आईने व्यक्त केल्या.आम्ही आमच्या मुलीच्या निधनाच्या धक्क्यातून अद्याप सावरलेलो नाही, मात्र सोना इतक्या लांब प्रवास करुन आमच्यासाठी आली, या तिच्या भावनाच फार गोड आहेत. तिला बघून माझं दुःख मायेत परावर्तित झालं, तिने माझ्या लेकाला राखी बांधल्याने आता तीसुद्धा आमची लेक आहे, अशा भावना मयत दात्रीच्या आईने बोलून दाखवल्या. दरम्यान, मुंबईतील सोना ही १३ वर्षांची मुलगी २०२२ मध्ये सुट्टीत उत्तर प्रदेश येथील अलिगढ या तिच्या मूळ गावी गेली होती. तिथे तिच्या चुलत भावासोबत खेळताना तिने गच्चीवरील उच्च क्षमतेच्या विजेच्या तारेला स्पर्श केला. या तारेचा धक्का बसल्याने ती भाजली आणि तिचा उजवा हात कापावा लागला.



तिच्या डाव्या हातालाही गंभीर दुखापत झाली. तिचा डावा हातही २० टक्के काम करत होता.अपघाताच्या दोन वर्षांनंतर, म्हणजेच गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात तिच्या हातावर मुंबईतील खासगी रुग्णालयामध्ये प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली. सुरतमधील नऊ वर्षीय मेंदूमृत दात्याकडून तिला हात मिळाला. या प्रत्यारोपणामुळे तिला नव्या आयुष्याची भेट मिळाली आहे, अशी भावना ती व्यक्त करते.अपघातानंतर काहीशी निराशा होती. मात्र आता मिळालेल्या या नव्या भेटीनंतर यंदा ती पुन्हा आपल्या भावाला राखी बांधून रक्षाबंधनचा सण साजरा करणार आहे. हात गमावल्यामुळे परावलंबित्व आले होते. मात्र प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञान आणि प्रत्यारोपणाच्या पर्यायामुळे आयुष्य सुखकर झाल्याची भावना तिने व्यक्त केली.

## एकीकडे लाडक्या बहिणी खूश, लाडके आमदार मात्र नाराज; नेमकं कारण काय?

नागपूर : लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळे महायुती सरकार सत्तेत आल्याने त्यांच्या खात्यात नियमित प्रत्येकी दीड हजार रुपये जमा होत आहेत. रक्षाबंधनाची भेट लाडक्या बहिणींना आधीच मिळाली, मात्र लाडक्या आमदारांकडे सरकारचे दुर्लक्ष झाले. आर्थिक वर्ष सुरू होऊन साडेचार महिने होऊनही अद्याप आमदारांना मिळणारा हक्काचा विकास निधीच आला नसल्याने आमदारांमध्ये मात्र नाराजी आहे.महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य, पोषणामध्ये सुधारणा करणे तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी राज्य शासनाने सुरू केलेली लाडकी बहीण योजना चांगलीच चर्चेत आली. मध्यप्रदेशात यशस्वी ठरलेली ही योजना महाराष्ट्रात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेच्या भरवश्यावरच महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले. लाडक्या बहिणींचा आशीर्वाद पाठीशी असल्याच्या प्रतिक्रियाही अनेक नेत्यांनी दिल्या. लाडक्या बहीण योजनेमुळे इतर विभागांचा निधी मिळण्यात विलंब होत असल्याच्या तक्रारी आता वाढू लागल्या आहेत. आमदारांना ५ कोटी रुपयांपैकी किमान २५ ते ३० टक्के विकासनिधी राज्य शासनाकडून प्राप्त होणे अपेक्षित होते. मात्र यावर्षी प्रथमच एकही रुपया प्राप्त न झाल्याने विकासकामे रखडली आहेत. ऐन पावसाळ्यात नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. आम्ही मतदान केले मात्र आता आमदार गायब झाले, अशा शब्दांत नागरिकांची ओरड सुरू असल्याची खंत नागपूर जिल्ह्यातील आमदारांनी व्यक्त केली.काँग्रेसच्या आमदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ङ्गराज्य सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी वळता केला आहे. त्यामुळे आमदार निधी अडवला गेला आहे,फ असा आरोप काँग्रेसचे उत्तर नागपुरातील आमदार नितीन राऊत यांनी केला. पावसाळ्याच्या अनुषंगाने मुरूम, खडीकरणाची कामे करणे गरजेचे होते. रस्त्यांवरील डांबर उखडले आहे. नगरसेवकही नसल्याने लोकांची गर्दी आमदारांकडे वाढली आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खळबळजनक! कपिल शर्माच्या कॅफेवर महिनाभरात दुसऱ्यांदा गोळीबार; कुख्यात गँगस्टरने स्वीकारली हल्ल्याची जबाबदारी....

**मुंबई:** कॉमेडियन कपिल शर्माने ४ जुलै रोजी कॅनडामध्ये नावाचा नवीन कॅफे सुरू केला होता. कपिलच्या मालकीच्या या कॅफेवर महिनाभरात दुसऱ्यांदा गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. कॅप्स कॅफेचे उद्घाटन झाल्यानंतर जुलै महिन्याच्या सुरुवातीला या इमारतीवर काही अज्ञातांनी गोळीबार केला आहे. आता पुन्हा एकदा गुरुवारी, ७ ऑगस्ट रोजी अशी घटना घडल्याचे वृत्त समोर आले आहे. ब्रिटिश कोलंबियामधील सरे या ठिकाणी असणाऱ्या एका इमारतीमध्ये हा कॅफे आहे. दरम्यान कपिल शर्माच्या कॅनडामधील कॅफेवर दुसऱ्यांदा गोळीबार झाला. इंडिया टुडेने याविषयी वृत्त दिले आहे. अवघ्या महिनाभराच्या कालावधीमध्ये याठिकाणी गोळीबाराची ही दुसरी घटना घडली आहे. मीडिया रिपोर्टनुसार, एका सोशल मीडिया पोस्टद्वारे गँगस्टर गोल्डी ढिल्लोंने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.मीडिया रिपोर्टनुसार, गोल्डी हा लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचा दावा त्याने केला आहे. हल्ल्याची जबाबदारी स्वीकारण्यासंदर्भात समोर आलेल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये याविषयी नमूद करण्यात आले आहे. ही पोस्ट अशी आहे की, जय श्री राम. सत् श्री अकाल, सर्व भावांना राम राम! कपिल शर्माच्या कॅप्स कॅफे, सरे याठिकाणी आज झालेल्या गोळीबाराची जबाबदारी गोल्डी ढिल्लों आणि लॉरेन्स बिश्नोई टोळीने घेतली आहे. आम्ही त्याला फोन केला होता, त्याने रिंग ऐकली नाही म्हणून आम्हाला कारवाई करावी लागली. जर त्याला अजूनही रिंग ऐकू आली नाही तर आम्ही लवकरच मुंबईत पुढील कारवाई करू.कॉमेडियन कपिल शर्मा आणि त्याच्या पत्नी गिन्नी चतरथ यांनी अगदी काहीच दिवसांपूर्वी हा कॅफे सुरू केला होता. जुलै महिन्याच्या सुरुवातीला गोळीबार झाल्यानंतर, काही दिवसांनी पुन्हा एकदा हा कॅफे ग्राहकांसाठी सुरू करण्यात आला. आता महिनाभरात दुसऱ्यांदा गोळीबाराची घटना घडल्याने परिसरात दहशतीचे वातावरण आहे. अद्याप याप्रकरणी कपिल, गिन्नी किंवा कॅफेच्या टीमकडून कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही





# बॉलिवूड अभिनेत्री हुमा कुरेशीच्या चुलत भावाची हत्या

## गाडी पार्किंगचा वाद जीवावर बेतला, दोन आरोपींना अटक....

**मुंबई** - बॉलिवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री हुमा कुरेशीच्या चुलत भावाची दिल्लीमध्ये हत्या झाली. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.दिल्लीतील निजामुद्दीनमध्ये पार्किंगवरून हुमाचा भाऊ आसिफ कुरेशीची हत्या करण्यात आली. गुरुवारी रात्री निजामुद्दीनच्या जंगपुरा भोगल बाजार लेनमध्ये स्कूटी गेटवरून काढून बाजूला पार्क करण्यावरून वाद झाला. या वादात आरोपीने आसिफ कुरेशीवर हल्ला केला. गंभीर जखमी असिफला रुग्णालयात नेण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं.आज तकच्या रिपोर्टनुसार, मृताच्या पत्नी आणि नातेवाईकांचं म्हणणं आहे की, आरोपींनी क्षुल्लक कारणावरून निर्घृण कृत्य केलं. मृत आसिफची पत्नी शैनाज कुरेशी आणि नातेवाईकांचा आरोप आहे की आरोपींनी क्षुल्लक कारणावरून आसिफवर क्रूर हल्ला केला. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. दोघांना अटकही करण्यात आली आहे. नातेवाईकांचे म्हणणं आहे की, आसिफवर यापूर्वीही हल्ला झाला आहे. त्याला मारण्यासाठी त्याच्यासोबत दोनदा जाणूनबुजून भांडण करण्यात आलेलं.मृताच्या पत्नीनं सांगितलं की, यापूर्वीही पार्किंगच्या वादावरून त्यांचं माझ्या पतीसोबत भांडण झालं होतं. माझा पती कामावरून घरी आला तेव्हा शेजाऱ्याची स्कूटी घरासमोर उभी होती, त्यानं ती स्कूटी शेजाऱ्याला काढून टाकण्यास सांगितली. पण स्कूटी काढून टाकण्याऐवजी शेजाऱ्यानं त्याला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली आणि धारदार शस्त्राने त्याची हत्या करण्यात आली.दिल्ली पोलिसांनी हत्येप्रकरणी दोन जणांना अटक केली आहे. पीडित व्यक्ती बॉलिवूड अभिनेत्रीच्या नात्यातली असून अभिनेत्रीनं अद्याप निवेदन दिलेलं नाही. सध्या पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरातील लोक घाबरले आहेत आणि संतापले आहेत. आसिफच्या मृत्यूमुळे कुटुंबाला धक्का बसलाय आणि ते न्यायाची मागणी करत आहेत. आरोपींवर लवकरच कठोर कारवाई केली जाईल असं पोलिसांनी सांगितलं आहे.





# संजू सॅमसनला फक्त एका कारणासाठीच मध्ये जायचंय, कोणतं आहे ते जाणून घ्या...

**नवी दिल्ली :** संजू सॅमसन हा पुढच्या आयपीएमध्ये च्या संघात जाणार, अशी जोरदार चर्चा आहे. पण संजूला चेन्नईच्या संघात का जायचं आहे, याचं एकमेव कारण आता समोर आलं आहे. संजू सॅमसन हा निष्णात यष्टीरक्षक तर आहेच, पण त्याचबरोबर तो एक धडाकेबाज फलंदाजही आहे. आयपीएलच्या लिलावात राजस्थान रॉयल्सच्या संघाने त्याला आपल्या ताफ्यात दाखल करुन घेतलं आणि त्यानंतर संजू गेल्यावर्षी राजस्थाच्या संघाकडून खेळला. पण या मोसमात तो संघाच्या एका गोष्टीमुळे आनंदी नव्हता. संघातील एक गोष्ट त्याला खटकत होती आणि ही गोष्ट त्याने संघ व्यवस्थापनाला सांगितली होती. पण त्या गोष्टीमध्ये कोणताही बदल झाला नाही. त्यानंतर आता संजू सॅमसनने संघच बदलण्याचा निर्णय घेतला असल्याचे आता समोर येत आहे. पुढच्या वर्षी संजू हा चेन्नईच्या संघाकडून खेळताना पाहायला मिळू शकतो, हे आता समोर आले आहे. संजू सॅमसन राजस्थानच्या संघाला चांगली सुरुवात करुन देत होता. पण त्यानंतर त्याला सलामीवरुन बाहेर करण्यात आलं आणि त्याला चौथ्या किंवा पाचव्या स्थानावर फलंदाजीला पाठवण्याचा निर्णय




घेण्यात आला. वैभव सूर्यवंशीबरोबर खरं तर संजू सलामीला यायला हवा होता, पण राजस्थानच्या संघाने मात्र तसं केलं नाही. राजस्थानच्या संघाने यशस्वी जयस्वालला वैभवबरोबर सलामीला पाठवले. त्यानंतर राजस्थानच्या संघाने संजू सॅमसनला चौथ्या आणि पाचव्या स्थानावर खेळायला सांगितले. ही गोष्ट संजूला आवडली नाही, त्यामुळेच संजू नाराज आहे आणि त्यामुळेच तो आता पुढच्या वर्षी दुसऱ्या संघाकडून खेळणार असल्याची जोरदार चर्चा सुरु झाली आहे.संजू सॅमसन हा राजस्थानच्या संघाकडून आयपीएल खेळत होता. पण एका गोष्टीवरुन त्याचे आणि संघाचे मतभेद सुरु झाले आहेत. हे मतभेद आता समोर आले आहेत. त्यामुळे आता संजू पुढच्या वर्षी राजस्थानच्या संघात राहणार नसल्याचे समोर आले आहे. पण संजूला चा संघ आपल्या टीममध्ये स्थान देणार की नाही, याची उत्सुकता आता सर्वांना असणार आहे.

# एकीकडे मातृशोक तर दुसरीकडे बहिणीचा सण अन् कर्तव्याची जाणीव...

## आईच्या निधनानंतरही भाऊ उभा राहिला विधवांच्या रक्षाबंधनाला !

**जनसंचलन/बुलढाणा**

स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी या शब्दात कवीने आईच्या अस्तित्वाचे महत्व विषद केले आहे.. जन्मदात्या आईचे निधन ही माणसाच्या आयुष्यातील अतिशय दुःखद घटना. आईचे छत्र हरवले की माणूस जसा काही पोरकाच होऊन जातो. दुःखाचा डोंगर कोसळणे म्हणतात ते अनुभवण्याचा क्षण म्हणजे आईचे निधन. या दुःखाच्या सावटात बहिणीचा आलेला सण अन् त्या सणातही कर्तव्य भावनेने भावाने केलेले रक्षाबंधन चर्चेचा विषय झाले आहे. विधवा महिलांचा हक्काचा भाऊ ठरलेले प्रा. डी एस लहाने यांनी परवा विधवा बहिणी सोबत रक्षाबंधन करून आपल्या दिवंगत मातेला प्रगल्भ सामाजिक जाणीवेची अनोखी आदरांजली अर्पित केली आहे. शिवशाही परिवाराचे आधारस्तंभ व मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.डी एस लहाने यांच्या मातोश्री राजको र बाई लहाने यांचे नुकतेच निधन झाले. हे निधन होऊन कुठेतरी चार-पाच दिवस झाले नाहीत तोच बहिण भावाच्या नात्याचा पवित्र क्षण रक्षाबंधन येऊन ठेपला. या दिवशी बहिण भावाच्या हातावर राखी बांधते आणि वर्षभर त्याच्याकडून पाठीशी उभ राहण्याचे वचन घेते. प्रेमाचा, आपुलकीचा हा सण आला मात्र प्रा.लहाने मातृशोकात होते. त्यांचे मूळ गाव लव्हाळा या गावी ते सध्या वास्तव्याला आहे. या ठिकाणी आईचे अंतिम संस्कार पार पडले. रक्षाबंधनाच्या दिवशी प्रा. लहाने गावात असल्याने परिसरातील विधवांनी राखी घेऊन जात तिथेच रक्षाबंधन केले. दिवसभर शेकडो विधवा बहिणी आपल्या हक्काच्या भावाच्या हातावर राखी बांधून एक प्रकारे त्यांचे दुःख वाटून घेत होत्या. या क्षणाने प्राध्यापक लहाने गहिवरून गेले. विधवा




महिलांसाठी विवाह सोहळे,विधवांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्यांचे प्रयत्न, शासन दरबारी सुरू असलेला लढा हा सर्व परिचित आहे. महापुरुषांच्या पावलावर पाऊल टाकत प्रा. लहाने सध्या विधवांचे हक्काचे भाऊ ठरले आहे. त्या विधवा बहिणींनी या दुःखद प्रसंगातही हातावर राख्या बांधून त्याचं दुःख वाटून घेत त्या हक्काच्या भावाच्या पाठीशी उभ्या राहिल्या.

# वाळू माफियांवर महसूलमंत्र्यांचा चाप; टिप्पर दिवसा गायब

**जनसंचलन/बुलडाणा**

वाळू माफियांविरोधात कडक पावले उचलण्याचे स्पष्ट निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्याने जिल्हा प्रशासनात खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात नुकत्याच पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत त्यांनी वाळू तस्करीवर तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले. यासोबतच, कारवाईस अडथळा आणणाऱ्या किंवा हलगर्जी करणाऱ्या अधिकाऱ्यांना थेट कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही दिला. मंत्र्यांच्या या इशाऱ्यांनंतर वाळू माफियांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाली आहे. यापूर्वी दिवसरात्र शहरात फिरणारे टिप्पर सध्या दिवसा तरी पूर्णतः गायब झाले आहेत. वाळू तस्करी करणारे आता उघडपणे कार्य करण्यास धजावत नाहीत




आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रू. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | गुंतवणूक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तिक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.




| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# चिखली तालुक्यात पावसाचे थैमान क्रांतिकारीचे पदाधिकारी अधिकाऱ्यांना घेऊन पोहोचले बांधावर; तातडीने पंचनामे करून नुसकान भरपाई देण्याची मागणी

**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यात काल ९ ऑगस्ट ला ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. पावसाने अक्षरशः थैमान घातल्याने नदी नाल्यांनी मार्ग बदलून प्रवाह केल्याने शेती आणि पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांवर अतिवृष्टीचे मोठे संकट ओढावले आहे. त्यामुळे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कृषि सहाय्यक व तलाठी यांना सोबत घेऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रामेश्वर अंभोरे यांनी केली आहे. गेले काही वर्षापासून अतिवृष्टी, नापिकी यामुळे शेतकरी संकटात आहेत. यावर्षी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात खर्च करून पेरणी करावी लागली. बँकेचे कर्ज घेऊन,दाग दागिने ठेवून पेरणीचा खर्च करावा लागला. सोयाबीन, कापूस, तुर, उडीद, मका या पिकांची लागवड चिखली तालुक्यात केलेली आहे. दरम्यान काल चिखली तालुक्यात पावसाने प्रचंड मोठे थैमान घातले. शेतजमिनी खरडून गेल्या, पिके वाहून गेली तर काही ठिकाणी शेतांचे तलाव तयार झाले आहेत. या पावसाने शेतकऱ्यांचे उभे पीक मोठ्या प्रमाणात पाण्यात बुडाल्याने खुप मोठ्या प्रमाणात नुसकान होऊन मोठी हानी झाली आहे. पावसाच्या या प्रकोपामुळे पांढरदेव, वरखेड, भोरसा भोरशी, सावंगी गवळी,नायगाव बु, मंगरूळ नवघरे, घानमोड मानमोड, अंबाशी, खैरव अशा अनेक गावांमध्ये



मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे शाळेमध्ये पाणी शिरले, घरात पाणी शिरले, जनावरांच्या गोठ्याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेकांच्या घरातील अन्न धान्य, घरातील साहित्य - कपडे खराब झाले असून अनेक गावांमध्ये विजेच्या तारा तुटून मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कृषी विभागातील अधिकाऱ्यांना सोबत घेऊन थेट बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. तसेच बाधित गावातील नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुसकान भरपाई द्यावी अशी मागणी केली. यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे रामेश्वर अंभोरे, हेमंत शेजोळ, गणेश शेजोळ, अशोक शेजोळ, नंदूभाऊ पांचाळ,विनोद हांडे,संतोष आकाळ, योगेश आकाळ, नागेश आकाळ , संदीप ढोरे ,तलाठी वराडे साहेब, कृषि सहाय्यक डुकरे पाटील मॅडम यासह शेतकरी उपस्थित होते.

# वाळू माफियांविरोधात महसूल मंत्री ॲक्शन मोडवर !

## जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर एमपीडीए कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा-महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील वाळू माफियांविरोधात महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे ॲक्शन मोडवर आले आहेत. जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर एमपीडीए अर्थात महाराष्ट्र धोकादायक व्यक्ती प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना शनिवारी महसूल विभागाच्या आढावा बैठकीत दिले. महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी, भूमि अभिलेख विभागाचा आढावा घेण्यासाठी महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे काल जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यानुषंगाने त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात महसूल व इतर विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी मंत्री ना. बावनकुळे यांनी निर्देश दिले. या बैठकीला कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार श्वेता महाले, आमदार संजय गायकवाड, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपवनसंरक्षक सरोज गवस, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार उपस्थित होते. याबैठकीत महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणारे आणि त्यात सामील असणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निगराणी ठेवून दोषींवर कारवाई करावी. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करतांना मंत्री, खासदार, आमदारांच्या सूचना आल्यास त्यानुसार कार्यवाही करु नका आणि वाळू माफियांना सोडू नका, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. जिल्ह्यात यापुढे अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीला जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांवर जबाबदारी निश्चित केली जाईल,असा इशाराही महसूल मंत्र्यांनी यावेळी दिला. याशिवाय, जिल्ह्यातील वाळू साठे आणि वाळू घाटांचे पुन्हा सर्व्हेक्षण करावे. त्यासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदारांनी पाहणी करावी व एमआरसॅक यंत्रणेचा वापर करावा. तसेच नवीन वाळू धोरणानुसार कार्यवाही करावी. यासह, कृत्रिम वाळू धोरणांतर्गत वाळूचा उच्च दर्जा असावा याची खबरदारी घ्यावी. घरकुलांसाठी गरीब, सर्वसामान्यांना वाळू उपलब्ध करुन द्यावी. अवैध वाळू वाहतुकदारांकडील प्रलंबित दंड वसूल करावे. गायरान जमिनीवरील घरांची प्रकरणे निकाली काढा, त्यासाठी व्यापक मोहीम राबवावी. गैरकायदेशीररित्या शासकीय जमिनी बळकावणाऱ्या धनदांग्यांवर कारवाई करावी. पाणंद व शिवरस्ते मोकळे करावे. त्यानुषंगाने गावनिहाय नकाशे तयार करुन दर्शनी भागात लावावे. नागरिकांच्या तक्रारी व प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी लोक अदालतीचे आयोजन करावे. विशेष सहाय योजना आणि ॲग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणीसाठी गावपातळीवर मोहीम राबवा. यासाठी प्रशासनाने शेतकऱ्यांच्या घरोघरी भेटी द्याव्यात. पोटखराब, कजाप, सातबारा दुरुस्तीची कामे लवकरात लवकर पूर्ण करावी. शासनाच्या धोरणानुसार डिसेंबर महिन्यापर्यंत भोगवटादार वर्ग २ च्या जमिनी भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरित कराव्यात. याबाबत




प्रस्ताव सादर करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन करावे. जिल्हा महसूल प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ई-चावडी, जिवंत सातबारा मोहिमेची अंमलबजावणी समाधानकारक असून या मोहिमेचा टप्पा दोन लवकर पूर्ण करा, असे निर्देश देवून महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोहिमेचे कौतूक केले. या बैठकीत महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाशी संबंधित विविध विषयांचा आढावा घेतला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८